**विषय :- स्वच्छ भारत अभियान (ना.) २.० अंतर्गत Empanelment Agency ची नेमणुक करणे बाबत.**

**प्रस्तावना:**

वरील विषयास अनुसरून 'स्वच्छ भारत अभियानात' सातत्य राखण्याच्या दृष्टीने व संपूर्ण नागरी भारत कचरा मुक्त करण्याच्या दृष्टीने वैयक्तिक, सामुदायिक व सार्वजनिक शौचालायांकरिताच्या गुंतवणुकीमध्ये सातत्य राखणे, वापरलेले पाणी व मैला यांची प्रक्रिया, विल्हेवाट व पुनर्वापर करणे, सर्व प्रकारच्या घनकचऱ्याचे व्यवस्थापन व जुना साठलेल्या कचरा, बांधकाम पाडकाम कचरा, प्लास्टिक कचरा इ. विल्हेवाट लावणे व व्यवस्थापन करणे व याकरिता आर्थिक मदत करणे या गरजा विचारात घेऊन केंद्र शासनाच्या गृहनिर्माण तथा नागरी कार्य मंत्रालयाद्वारे "स्वच्छ भारत अभियान नागरी २.०" चा प्रारंभ करण्यात आला असून, सदर अभियान दिनांक २ ऑक्टोबर, २०२१ ते दिनांक १ ऑक्टोबर, २०२६ पर्यंत राबविले जाणार आहे.

केंद्र शासनाच्या 'स्वच्छ भारत अभियान (नागरी) २.०' च्या धर्तीवर महाराष्ट्र राज्यात दि. १५ जुलै, २०२२ च्या शासन निर्णय, नगर विकास विभाग, क्र.-स्वमअ-२०२२/प्र.क्र.७३/नवि-३४ अन्वये 'स्वच्छ महाराष्ट्र अभियान नागरी (२.०)' राबविण्यात येत असून या अभियानचा मुख्य उद्देश राज्यातील सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्था 'कचरा मुक्त' करणे असा आहे. सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाचे स्वच्छ भारत अभियान २.० अंतर्गत घनकचरा व्यवस्थापन आणि मलनिस्सारण संबंधित प्रकल्पांचे **सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणे, निविदा प्रक्रिया राबविणे व प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार** म्हणून काम करण्यासाठी शासनामार्फत प्रशासकीय विभाग निहाय प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार संस्थांची नामिकासूची तयार करण्यात आली आहे. कोकण विभागातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी 1. IQVIA Consulting and Information Services India Pvt. Ltd in consortium with Vision EIS Consulting Pvt. Ltd, 2. MaRS Planning and Engineering Services Pvt. Ltd या **दोन** प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार संस्थांचा नामिकासूची मध्ये समावेश करण्यात आला आहे.

स्वच्छ भारत अभियान (ना.) २.० अंतर्गत मंजूरीसाठी शासनाकडे पाठविण्यात आलेल्या प्रकल्पांबाबत पुढील कामांसाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार संस्थेची नियुक्ती करणे आवश्यक असून प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार संस्था नियुक्ती ची मानक कार्यप्रणाली व सूचना पुढीलप्रमाणे आहेत.

**अ. Scope of Work (कामाची व्याप्ती)**

१. सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणे. (Detailed Project Reports)

सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणे अंतर्गत पुढील बाबींचा समावेश करण्यात आला आहे:-

- Collection & Transportation of Waste
- Street Sweeping
- Municipal Solid Waste (MSW) Treatment
- Processing (through Bio-Methanation Plant)
- Waste to Energy Plant
- RDF Plants
- Sanitary Landfill
- Dumpsite Remediation
- Bio-Mining
- Transfer Station
- Scientific Capping of Dumpsite
- Leachate Management
- Construction & Demolition (C&D) Waste Processing
- Plastic Waste Management
- Any other component associated with Municipal Solid Waste (**Textile waste management**)

२. व्यवहार सल्लागार व निविदा प्रक्रिया व्यवस्थापन अंतर्गत निविदा प्रक्रिया राबविणे. (Transaction Advisory including Bid Management)

सविस्तर प्रकल्प अहवालातील सर्व प्रकल्पांच्या निविदा तयार करणे, निविदा प्रसिद्ध करणे, निविदा प्रक्रिया राबवून प्रकल्प अंमलबजावणी एजेन्सी ची नियुक्ती होणे पर्यंत व्यवहार सल्लागार व निविदा प्रक्रिया व्यवस्थापन चे काम करणे.

३. एकात्मिक घनकचरा व्यवस्थापनाच्या अंमलबजावणीसाठी पर्यवेक्षण आणि देखरेख सेवा पुरविणे. (Provision of supervision and monitoring services for implementation of Integrated Solid Waste Management)

एकात्मिक घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प अंमलबजावणी एजेन्सी ची नियुक्ती झाल्यानंतर प्रकल्पांच्या अंमलबजावणी दरम्यान प्रकल्पांचे पर्यवेक्षण आणि देखरेख सेवा पुरविणे. सदर पर्यवेक्षण व देखरेख सेवेचा प्रारंभिक कालावधी १२ महिन्यांपर्यंत असेल, प्रकल्प पूर्ततेच्या आवश्यकतेनुसार सक्षम प्राधिकारी यांच्या परवानगी नंतरच परस्पर सहमत अटी व शर्तीच्या अधीन राहून पर्यवेक्षण आणि देखरेख सेवा कालावधीस मुदतवाढ देण्यात येऊ शकते.

**आ. Selection of the Consultancy firm**

कोकण विभागातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी 1. IQVIA Consulting and Information Services India Pvt. Ltd in consortium with Vision EIS Consulting Pvt. Ltd, 2. MaRS Planning and Engineering Services Pvt. Ltd या **दोन** प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार संस्थांचा नामिकासूची मध्ये समावेश करण्यात आला असून पैकी MaRS Planning and Engineering Services Pvt. Ltd यांनी महाराष्ट्र, गुजरात, मध्यप्रदेश, झारखंड, कर्नाटक आणि बिहार या राज्यातील सुमारे २४५ विविध नागरी स्थानिक स्वराज्य संस्था चे घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प (एकूण ८००० टन प्रती दिन) , राडा रोडा कचरा प्रकल्प, बायोमायनिंग प्रकल्प (एकूण ७० लक्ष मेट्रिक टन), ट्रान्स्फर स्टेशन प्रकल्प आणि शास्त्रोक्त भूमी भराव प्रकल्प चे सविस्तर प्रकल्प अहवाल, प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून काम केले आहे. तसेच घनकचरा व्यवस्थापन व स्वच्छ भारत अभियान (१.० व २.०) अंतर्गत सुमारे २००० कोटी रुपयांच्या प्रकल्पांसाठी अमरावती महापालिका, सुरत महापालिका, राजकोट महापालिका, रतलाम महापालिका इ. अशा एकूण २४५ विविध शहरांमध्ये सल्लागार म्हणून काम केले आहे.

MaRS Planning and Engineering Services Pvt. Ltd संस्थेने भिवंडी निजामपूर शहर महापालिका मुख्यालय येथे येऊन त्यांच्या कामाचे व अनुभवाचे सादरीकरण केले आहे. MaRS Planning and Engineering Services Pvt. Ltd या संस्थेचा अनुभव व व्याप्ती पाहता सदर संस्थेस स्वच्छ भारत अभियान (ना.) २.० अंतर्गत प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून नियुक्त करण्यास हरकत नसावी.

**इ. Completion Period of Empanelment**

प्रकल्प सल्लागार संस्थेच्या नियुक्ती दिनांकापासून पुढे २४ महिने पर्यंत संबंधित संस्थेचा कार्यकाळ असेल, सदर कालावधीत नियुक्त संस्थे मार्फत Scope of Work मधील सर्व कामे पूर्ण करायची आहेत. प्रकल्प पूर्णत्वाच्या आवश्यकतेनुसार सक्षम प्राधिकारी यांच्या परवानगी नंतरच परस्पर सहमत अटी व शर्तीच्या अधीन राहून Empanelment Scope of Work मधील कामांच्या अंमलबजावणी कालावधीसाठी मुदतवाढ देण्यात येऊ शकते.

**ई. Execution of Contract Agreement (CA)**

नियुक्त प्रकल्प सल्लागार संस्थेस नियुक्ती पत्र / कार्यादेश प्राप्त झाल्यानंतर भिवंडी महापालिका आणि प्रकल्प सल्लागार संस्था यांचे मध्ये स्वच्छ भारत अभियान (ना.) २.० अंतर्गत घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पांची मंजूर कामे करणे बाबत आवश्यक अटी व शर्तीच्या अधीन राहून करारनामा करणे. नियुक्त प्रकल्प सल्लागार संस्था हि जर इतर संस्थेसोबत Consortium भागीदारी मध्ये असल्यास मूळ प्रकल्प सल्लागार संस्था, भागीदार प्रकल्प सल्लागार संस्था आणि भिवंडी मनपा यांचे मध्ये आवश्यक अटी व शर्तीच्या अधीन राहून करारनामा करणे. नियुक्त प्रकल्प सल्लागार संस्थेस व भागीदार प्रकल्प सल्लागार संस्था यांना करारनामा मधील कोणत्याही अटी व शर्तीचे

उल्लंघन करता येणार नाही. नियुक्त मूळ प्रकल्प सल्लागार संस्थेस व भागीदार प्रकल्प सल्लागार संस्था यांनी करारनामा करते वेळेस करार मूल्याच्या ३% एवढी रक्कम **अतिरिक्त बँक गॅरंटी (Additional Bank Guarantee)** म्हणून भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका निर्देशित बँकेत जमा करावी.

**उ. Additional Performance Bank Guarantee (A-PBG) and Mode of Payment**

नियुक्त प्रकल्प सल्लागार संस्था यांनी करारनामा झाल्या नंतर सात दिवसाच्या आत करार मूल्याच्या ३% एवढी रक्कम **अतिरिक्त कामगिरी बँक गॅरंटी (Additional Performance Bank Guarantee)** म्हणून भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेने निर्देशित केलेल्या बँकेत जमा करावी.

**ऊ. Insurances**

व्यावसायिक नुकसान भरपाई विमा संरक्षण म्हणून नियुक्त प्रकल्प सल्लागार संस्था च्या बँक खात्यामध्ये किमान रु.५० लक्ष एवढी रक्कम असणे आवश्यक आहे. भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेने विचारणा केली असता व्यावसायिक नुकसान भरपाई विमा संरक्षण काढले असल्याचे, किमान व्यावसायिक नुकसान भरपाई विमा संरक्षण रक्कम (रु.५० लक्ष) बँक खात्यामध्ये राखल्याचे व वर्तमान विम्याचा हप्ता भरल्याचे पुरावे देणे नियुक्त प्रकल्प सल्लागार संस्था व भागीदार प्रकल्प सल्लागार संस्था यांना बंधनकारक आहे.

**ऋ. Deliverable and Payment Schedule:**

स्वच्छ भारत अभियान (ना.) २.० अंतर्गत शहर घनकचरा कृती आराखडा (CSWAP) चे रु.५८.४७ कोटी एवढ्या किमतीचे प्रस्ताव राज्य शासनास मान्यतेस्तव सादर करण्यात आले असून त्या अंतर्गत पुढील घटकांचा समावेश आहे:-

| अ. क्र. | घटक | क्षमता / युनिट (टन प्रती दिवस) | युनिट दर (रु.) | प्रस्तावितखर्च (रु.) |
|---|---|---|---|---|
| १ | ओला कचरा कम्पोस्टिंग प्रक्रिया केंद्र | २०.७९ | ११,५०,०००.०० | २,३९,०४,८५२.८६ |
| २ | सुका कचरा प्रक्रिया केंद्र | ९६.३३ | ८,५०,०००.०० | ८,१८,८२,७३७.६३ |
| ३ | ट्रान्सफर स्टेशन | ४४० | ४,५०,०००.०० | १९,८०,००,०००.०० |
| ४ | सॅनिटरी लँडफिल | १०६.१७ | ६,५०,०००.०० | ६,९०,१२,५६५.५७ |
| ५ | जुन्या कचऱ्यावर प्रक्रिया | ४६२१७८.१४ | ४४७.०० | २०,६५,९३,६२८.६० |
| ६ | रस्ते सफाई साठी यांत्रिकीवाहने | १ युनिट | ५५,००,०००.०० | ५५,००,०००.०० |
| | | | एकूण | **५८,४८,९३,७८४.६६** |

वरील तक्त्यात नमूद घटकांपैकी घटक क्र. ५जुन्या कचऱ्यावर प्रक्रिया करणे कामी निविदा प्रक्रिया राबविण्यात आली असून काम प्रगतीपथावर आहे,सदर घटक हा EmpanelmentAgency मार्फत फक्त Supervision and Monitoring during Implementation या कामासाठी राबविण्यात येणार आहे. स्वच्छ भारत अभियान २.० अंतर्गत घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पाची किंमत रु.५८,४८,९३,७८६/- इतकी असून सदर प्रकल्प किंमतीसाठी C-21 वर नमूद केलेल्या रु.६० कोटी प्रकल्प किमतीसाठीचे निर्धारित मुल्यांकन ग्राह्य धरून प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) संस्थेचे सल्ला शुल्क (Consulting Fees) ची संरचना पुढीलप्रमाणे:-

| Component Name | Estimated Cost of the Project Component (INR) in Rs./- | Service Component Wise Breakup of Consulting Fees (%) | | | Total Consulting Fees Rs./- |
|---|---|---|---|---|---|
| | | Milestone 1 – Detailed Project Report (C) | Milestone 2 – Transaction Advisory including Bid Process Management (D) | Milestone 3 – Supervision and Monitoring during Implementation (12 Months) (E) | |
| | (A) | 0.90% × (A) | 0.23% × (A) | 1.13% × (A) | (C+D+E) |
| ओला कचरा कम्पोस्टिंग प्रक्रिया केंद्र | २,३९,०४,८५३/- | २,१५,१४४/- | ५४,९८१/- | २,७०,१२५/- | **५,४०,२५०/-** |
| सुका कचरा प्रक्रिया केंद्र | ८,१८,८२,७३८/- | ७,३६,९४५/- | १,८८,३३०/- | ९,२५,२७५/- | **१८,५०,५५०/-** |
| ट्रान्सफर स्टेशन | १९,८०,००,०००/- | १७,८२,०००/- | ४,५५,४००/- | २२,३७,४००/- | **४४,७४,८००/-** |
| सॅनिटरी लँडफिल | ६,९०,१२,५६६/- | ६,२१,११३/- | १,५८,७२९/- | ७,७९,८४२/- | **१५,५९,६८४/-** |
| जुन्या कचऱ्यावर प्रक्रिया | २०,६५,९३,६२९/- | लागू नाही | लागू नाही | २३,३४,५०८/- | **२३,३४,५०८/-** |
| रस्ते सफाई साठी यांत्रिकीवाहने | ५५,००,०००/- | ४९,५००/- | १२,६५०/- | ६२,१५०/- | **१,२४,३००/-** |
| | | | | | **१,०८,८४,०९२/-** |

MaRS Planning and Engineering Services Pvt. Ltd या संस्थांचा अनुभव व कामाची व्याप्ती पाहता सदर संस्थेस स्वच्छ भारत अभियान (ना.) २.० अंतर्गत सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणे, (Detailed Project Reports), व्यवहार सल्लागार व निविदा प्रक्रिया व्यवस्थापन अंतर्गत निविदा प्रक्रिया राबविणे, (Transaction Advisory including Bid Management) आणि एकात्मिक घनकचरा व्यवस्थापनाच्या अंमलबजावणीसाठी पर्यवेक्षण आणि देखरेख सेवा पुरविणे (Provision of supervision and monitoring services for Implementation of Integrated Solid Waste Management) या कामांसाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून नियुक्त करणे व त्यासाठी रु.१,०८,८४,०९२/- एवढे सल्ला शुल्क (ConsultingFees) स्वच्छ भारत अभियान (ना.) २.० अंतर्गत घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पाच्या निधी मधून देणे कामी आरोग्य विभागाने प्रस्तावित करण्यात आले असता मा. आयुक्त तथा प्रशासक सो. यांनी दि.२१/०४/२०२३ रोजी मान्यता देऊन स्वच्छ भारत अभियान (ना.) २.० अंतर्गत MaRS Planning and Engineering Services Pvt. Ltd या संस्थेस Empanelment Agency म्हणून नियुक्त करण्यास मा. स्थायी समितीच्या मान्यतेच्या अधीन राहून विहित नमुन्यात केलेल्या करारनामा करणेस मान्यता दिली आहे. स्वच्छ भारत अभियान (ना.) २.० अंतर्गत Empanelment Agency नियुक्त करणेसाठी

सद्यस्थितीत मा. स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने मा. प्रशासक तथा आयुक्त यांची मान्यता मिळणे कामी विनंती आहे.

प्रशासकीय ठराव क्र. १६८ दिनांक: १५/५/2023

स्वच्छ भारत अभियान (ना.) २.० अंतर्गत MaRS Planning and Engineering Services Pvt. Ltd या संस्थेस प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून नियुक्त करणे करिता प्रशासक तथा आयुक्त यांची मान्यता मिळणे बाबत प्रशासनाने प्रस्ताव सादर केला आहे.

महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन निर्णय क्र.एमसीओ२०२०/प्र.क्र.७१भाग(२)/नवि दि.०६ जुन २०२२ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ४५२ अ (१अ) व (१ब) च्या तरतूदीनुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार (महासभा व स्थायी समिती अधिकार) मी विजयकुमार म्हसाळ, प्रशासक तथा आयुक्त, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका स्वच्छ भारत अभियान (ना.) २.० अंतर्गत MaRS Planning and Engineering Services Pvt. Ltd या संस्थेस प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून नियुक्त करणे व त्यासाठी स्वच्छ भारत अभियान (ना.) २.० अंतर्गत घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पाच्या निधी मधून रु.१,०८,८४,०९२/- इतके सल्ला शुल्क (ConsultingFees) देणे करिता मान्यता देण्यात येत आहे.

**(विजयकुमार म्हसाळ)**
**प्रशासक तथा आयुक्त**
**भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका**

# भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका,भिवंडी

**प्रस्तावना :-**

**विषय :- महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोई सुविधांच्या विकासासाठी विशेष तरतुद योजनेअंतर्गत निधी वितरीत करणे बाबत.**

उपरोक्त विषयांकीत कामी शासन निर्णय क्रमांक : मनपा-२०२३/प्र.क्र. ८७-ब-१२२/न.वि.-१६ दि. २५ मार्च २०२३ रोजी मंजुरी प्राप्त झालेली आहे. सदर पत्रान्वये मनपास **महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोई सुविधांच्या विकासासाठी विशेष तरतुद** योजनेअंतर्गत १००% शासन निधी प्राप्त होणार आहे. सदर पत्रातील कामाच्या यादि मधील खालिल कामे प्र.स.क्र. ०५, बांधकाम विभागाशी संबंधित आहेत.

| यादितील अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|
| १) | वॉर्ड क्र.05 मधील निजामपुरा अंतर्गत विविध ठिकाणी गटार व पाथवेज बनविणे | रु. ४९,९९,९३४/- |
| | **एकुण रक्कम** | **रु. ४९,९९,९३४/-** |

उपरोक्त नमुद कामांचे प्रस्ताव तयार करुन मा. प्रशासक तथा आयुक्त सो. यांचे मंजुरि करिता सादर करण्यांत आले असता, सदर प्रस्तावास शहर अभियंता, मुख्य लेखापरिक्षक, मुख्य लेखा व वित्त आधिकारी तसेच अति.आयुक्त यांनी केलेल्या शिफारसी प्रमाणे मा. प्रशासक तथा आयुक्त महोदय यांनी त्यास दिनांक २१/०४/२०२३ रोजी मान्यता दिलेली आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ७३(क) अन्वये प्रशासकीय मान्यता करिता मा. जिल्हाधिकारी, ठाणे. यांचेकडे प्रस्ताव पाठविणेकामी प्रशासकीय ठराव करणेकामी मंजुरिस्तव सविनय सादर.

**ठराव क्रं. :-** १६६ **दिनांक :-** १५/५/२०२३

उपरोक्त विषयांकीत कामी शासन निर्णय क्रमांक : मनपा-२०२३/प्र.क्र. ८७-ब-१२२/न.वि.-१६ दि. २५ मार्च २०२३ रोजी मंजुरी प्राप्त झालेली आहे. सदर पत्रान्वये मनपास **महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोई सुविधांच्या विकासासाठी विशेष तरतुद** योजनेअंतर्गत १००% शासन निधी प्राप्त होणार आहे. सदर पत्रातील कामाच्या यादि मधील खालिल कामे प्र.स.क्र. ०५, बांधकाम विभागाशी संबंधित आहेत.

| यादितील अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|
| १) | वॉर्ड क्र. 05 मधील निजामपुरा अंतर्गत विविध ठिकाणी गटार व पाथवेज बनविणे | रु. ४९,९९,९३४/- |
| | **एकुण रक्कम** | **रु. ४९,९९,९३४/-** |

उपरोक्त नमुद  कामांचे प्रस्तावास शहर अभियंता, मुख्य लेखापरिक्षक, मुख्य लेखा व वित्त आधिकारी तसेच अति.आयुक्त यांनी शिफारस केलेली आहे. महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग, कडील शासन आदेश क्रमांक :- मनपा-२०२३/प्र.क्र.८७-ब-१२२(०६)/न.वि-१६, दिनांक २५ मार्च  २०२३ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेष:त कलम ४५२ अ (१अ)व (१ब) मधील तरतुदीनुसार मला प्राप्त झालेल्या अधिकरानुसार मी विजयकुमार म्हसाळ, प्रशासक तथा आयुक्त, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमान्वये वरिल नमुद एकुण कामांच्या एकत्रीत अंदाजपत्रकीय रक्कम  रु. ४९,९९,९३४/- च्या प्रस्तावास मा. जिल्हाधिकारी, ठाणे. यांचेकडे प्रशासकीय मान्यता करिता पाठविणेकामी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ७३(क) अन्वये मंजुरी देत आहे.

(विजयकुमार म्हसाळ)

**प्रशासक तथा आयुक्त**

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका

# भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका,भिवंडी

**प्रस्तावना :-**

**विषय :- महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोई सुविधांच्या विकासासाठी विशेष तरतुद योजनेअंतर्गत निधी वितरीत करणे बाबत.**

उपरोक्त विषयांकीत कामी शासन निर्णय क्रमांक : मनपा-२०२३/प्र.क्र. ८७-ब-१२२/न.वि.-१६ दि. २५ मार्च २०२३ रोजी मंजुरी प्राप्त झालेली आहे. सदर पत्रान्वये मनपास **महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोई सुविधांच्या विकासासाठी विशेष तरतुद** योजनेअंतर्गत १००% शासन निधी प्राप्त होणार आहे. सदर पत्रातील कामाच्या यादि मधील खालिल कामे प्र.स.क्र. ०५, बांधकाम विभागाशी संबंधित आहेत.

| यादितील अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|
| २) | वॉर्ड क्र. 05 मधील निजामपुरा अंतर्गत विविध ठिकाणी लादीकरण करणे. | रु. ४९,९९,३२४/- |
| | **एकुण रक्कम** | रु. ४९,९९,३२४/- |

उपरोक्त नमुद कामांचे प्रस्ताव तयार करुन मा. प्रशासक तथा आयुक्त सो. यांचे मंजुरि करिता सादर करण्यांत आले असता, सदर प्रस्तावास शहर अभियंता, मुख्य लेखापरिक्षक, मुख्य लेखा व वित्त आधिकारी तसेच अति.आयुक्त यांनी केलेल्या शिफारसी प्रमाणे मा. प्रशासक तथा आयुक्त महोदय यांनी त्यास दिनांक २१/०४/२०२३ रोजी मान्यता दिलेली आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ७३(क) अन्वये प्रशासकीय मान्यता करिता मा. जिल्हाधिकारी, ठाणे. यांचेकडे प्रस्ताव पाठविणेकामी प्रशासकीय ठराव करणेकामी मंजुरिस्तव सविनय सादर.

ठराव क्रं. :- १६५ दिनांक :- १५/५/२०२३

उपरोक्त विषयांकीत कामी शासन निर्णय क्रमांक : मनपा-२०२३/प्र.क्र. ८७-ब-१२२/न.वि.-१६ दि. २५ मार्च २०२३ रोजी मंजुरी प्राप्त झालेली आहे. सदर पत्रान्वये मनपास **महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोई सुविधांच्या विकासासाठी विशेष तरतुद** योजनेअंतर्गत १००% शासन निधी प्राप्त होणार आहे. सदर पत्रातील कामाच्या यादि मधील खालिल कामे प्र.स.क्र. ०५, बांधकाम विभागाशी संबंधित आहेत.

| यादितील अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|
| २) | वॉर्ड क्र. 05 मधील निजामपुरा अंतर्गत विविध ठिकाणी लादीकरण करणे. | रु. ४९,९९,३२४/- |
| | **एकुण रक्कम** | रु. ४९,९९,३२४/- |

उपरोक्त नमुद  कामांचे प्रस्तावास शहर अभियंता, मुख्य लेखापरिक्षक, मुख्य लेखा व वित्त आधिकारी तसेच अति.आयुक्त यांनी शिफारस केलेली आहे. महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग, कडील शासन आदेश क्रमांक :- मनपा-२०२३/प्र.क्र.८७-ब-१२२(०६)/न.वि-१६, दिनांक २५ मार्च  २०२३ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेष:त कलम ४५२ अ (१अ)व (१ब) मधील तरतुदीनुसार मला प्राप्त झालेल्या अधिकरानुसार मी विजयकुमार म्हसाळ, प्रशासक तथा आयुक्त, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमान्वये वरिल नमुद एकुण कामांच्या एकत्रीत अंदाजपत्रकीय रक्कम  रु. ४९,९९,३२४/- च्या प्रस्तावास मा. जिल्हाधिकारी, ठाणे. यांचेकडे प्रशासकीय मान्यता करिता पाठविणेकामी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ७३(क) अन्वये मंजुरी देत आहे.

(विजयकुमार म्हसाळ)

**प्रशासक तथा आयुक्त**

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका

# भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी.
## पाणी पुरवठा विभाग

**विषय :- घनकचरा प्रकल्प अहवालानुसार मौजे काटई मल:निस्सारण केंद्र येथे १० टी.पी.डी. क्षमतेचा बायोगॅस प्लॅन्ट उभारणे बाबतच्या प्राप्त दरांना प्रशासकीय मान्यता मिळणे बाबत.**

स्वच्छ भारत सर्वेक्षण अंतर्गत तसेच भिवंडी शहरातील तयार होणाऱ्या काही प्रमाणात कचऱ्यावर प्रक्रिया करुन बायोगॅस प्रकल्प उभारणे गरजेचे आहे. भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेचे घनकचरा व्यवस्थापनासाठी प्रकल्प तयार केलेला असुन भिवंडी महानगरपालिका क्षेत्रात मौजे काटई मल:निस्सारण केंद्र येथे १० मे.ट. क्षमतेचा बायोगॅस प्लॅन्ट उभारणे कामी R.F.P. मागवुन एजन्सी नेमुन त्यांचे मार्फत BARC's NISARGRUNA Tecnology चा प्लॅन्ट उभारणे कामी प्रकल्प अहवाल तयार करणे व ५ वर्षा करीता वार्षिक निगा, दुरुस्ती व देखभाली करीता मा. प्रशासकीय ठराव क्र.१०२, दि. २७/०२/२०२३ रोजी अन्वये मान्यता प्राप्त झालेली आहे. सदर कामी घनकचरा प्रकल्प अहवालामध्ये रु.५,००,८५,०००/- मात्रची तरतुद करण्यांत आलेली आहे.

त्यानुसार भिवंडी महानगरपालिका क्षेत्रात मौजे काटई मल:निस्सारण केंद्र या ठिकाणी १० मे.ट. क्षमतेचा BARC's NISARGRUNA TECHNOLOGY चा बायोगॅस प्लॅन्ट उभारणे कामी दै.वृत्तपत्रात तसचे महा-ई-टेंडर्स या संकेतस्थळावर प्रसिद्ध करुन ई-निविदा मागविण्यात आली असुन प्राप्त निविदांची छाननी प्रक्रीया पुर्ण झाली तौलानिक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | प्रकल्प उभारणी | प्रकल्प परिचलन व देखभाल | एकुण दर |
|---|---|---|---|
| **१) मे. लाहस ग्रीन इंडीया प्रा. लि. -** | **रु.२३०५८२१९** | **रु.२६११८८०६** | **रु.४९१७७०२५/-** |
| २) मे. उर्जा बायो सिस्टम प्रा. लि. - | रु..२३४४४०७ | रु.२६५५५९०३ | रु.५००००३१०/- |

उपरोक्त प्राप्त दरांपैकी मे. लाहस ग्रीन इंडीया प्रा. लि. यांचे सर्वांत कमी दर प्राप्त झालेले आहे.

| अ.क्र. | तपशिल | रक्कम |
|---|---|---|
| १. | **प्रकल्प उभारणी (A)** | **२,३०,५८,२१९/-** |
| २. | **प्रकल्प परिचालन व देखभाल दुरुस्ती ५ वर्षाकरीता (B)** | **२,६१,१८,८०६/-** |
| | | |
| **एकुण (A+B)** | | **४,९१,७७,०२५/-** |
| **(अक्षरी - चार कोटी एक्क्याण्णव लाख सत्त्यात्तर हजार पंचवीस रुपये मात्र.)** | | |

सदर कामास मा. महासभेची मान्यता प्राप्त झालेली आहे. दरम्यानच्या कालावधी मा. स्थायी समिती संपुष्टात आलेली आहे.

शासन आदेश क्र. एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१(भाग-२)नवि-१४, दि.०६ जुन २०२२ रोजी नुसार मा. महासभा व मा. स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेसाठी प्रशासक नियुक्त करण्यांत आलेले आहेत. त्यामुळे भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेचा कार्यभार हे प्रशासक पहात आहेत. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५२ अ च्या (१अ) व (१ब) मधील तरतुदीनुसार निविदा विषयक संविदा करण्याचे अधिकार मा. प्रशासक यांना आहेत.

उपरोक्त नमुद पाणी पुरवठा विभागाकडील भिवंडी महानगरपालिका क्षेत्रात मौजे काटई मल:निस्सारण केंद्र या ठिकाणी १० मे.ट. क्षमतेचा बायोगॅस प्लॅन्ट उभारणे कामी R.F.P. मागवुन एजन्सी नेमुन त्यांचे मार्फत BARC's NISARGRUNA Tecnology चा प्लॅन्ट उभारणे कामी प्रकल्प अहवाल तयार करणे व ५ वर्षा करीता वार्षिक निगा, दुरुस्ती व देखभाल करणे बाबत कामाच्या **₹ ४,९१,७७,०२५/-** मात्रच्या निविदेच्या दरांना मंजुरी देणे बाबतचा प्रस्ताव.

**ठराव क्रमांक :** १६४ **दिनांक :** १० / ०५ / **२०२३**

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा विभागाकडील भिवंडी महानगरपालिका क्षेत्रात मौजे काटई मल:निस्सारण केंद्रं या ठिकाणी १० मे.ट. क्षमतेचा बायोगॅस प्लॅन्ट उभारणे कामी R.F.P. मागवुन एजन्सी नेमुन त्यांचे मार्फत BARC's NISARGRUNA Tecnology चा प्लॅन्ट उभारणे कामी प्रकल्प अहवाल तयार करणे व ५ वर्षा करीता वार्षिक निगा, दुरुस्ती व देखभाली कामाच्या ₹ ४,९१,७७,०२५/- मात्रच्या निविदेच्या दरांना मंजुरी देणे बाबतचा प्रस्ताव कार्यकारी अभियंता व अति. आयुक्त यांनी शिफारस केल्यानुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन निर्णय क्र. एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१(भाग-२)नवि-१४, दि.०६ जुन २०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१अ) व (१ब) मधील तरतुदीनुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी विजयकुमार म्हसाळ, प्रशासक तथा आयुक्त, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका पाणी पुरवठा विभागाकडील भिवंडी महानगरपालिका क्षेत्रात मौजे काटई मल:निस्सारण केंद्र या ठिकाणी १० मे.ट. क्षमतेचा बायोगॅस प्लॅन्ट उभारणे कामी R.F.P. मागवुन एजन्सी नेमुन त्यांचे मार्फत BARC's NISARGRUNA Tecnology चा प्लॅन्ट उभारणे कामी प्रकल्प अहवाल तयार करणे व ५ वर्षा करीता वार्षिक निगा, दुरुस्ती व देखभाल करणे बाबत कामाच्या **₹ ४,९१,७७,०२५/-** मात्रच्या निविदेच्या दरांना मंजुरी देत आहे.

**(विजयकुमार म्हसाळ)**
**प्रशासक तथा आयुक्त**
**भिवंडी नि.शहर महानगरपालिका,भिवंडी.**

# भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी.
## पाणी पुरवठा विभाग

**विषय :- (सन २०२३-२०२४)**
**भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका प्रभाग समिती क्र. १ ते ५ च्या कार्यक्षेत्रात अस्तित्वात असलेल्या बोअरवेल निगा व दुरुस्तीकामी एक वर्षाच्या कालावधी करीता साहित्य पुरविणेबाबत.**

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेचे क्षेत्रफळ २६.५ चौ.कि.मि. इतके आहे.पाणी पुरवठा विभागाचे दैनंदिन कामकाज प्रभाग समिती निहाय चालते प्रभाग समिती क्र. १ ते ५ मनपा कार्यक्षेत्रामध्ये एकूण २०२७ बोअरवेल आहेत. अस्तीत्वात असलेल्या बोअरवेल निगा व दुरुस्तीचे कामकाज वार्षिक ठेकापध्दतीने ठेकेदारा मार्फत करुन घेतले जाते.

प्रभाग समिती निहाय मनपा कार्यक्षेत्रात नागरीकांच्या बोअरवेल नादुरुस्तीच्या तक्रारी येत असतात सदर तक्रारींचे निवारण वेळेच्या वेळी करावे लागते तसेच सन्मा. पदाधिकारी व नागरीकांच्या प्रत्यक्ष व फोन वरुन दैनंदिन प्राप्त होणाऱ्या तक्रारींचे निवारण करावे लागते. सद्या कोंडवाडा येथील मनपाच्या भंडारगृहात (उदा. हातपंप साठी लागणारे साहित्य जीआय युनिअन, जीआय पाईप, हॅन्ड पंप सिलेंडर, हॅन्ड पंप जीआय स्टॅन्ड, वॉटर टॅक, जीआय हेड, गन मेटल अप्पर व्हॉल्व, गन मेटल लोवर व्हॉल्व, स्टेनलेस स्टील प्लंगर रॉड, रेड्युसर कॅप, गन मेटल प्लंगर लॉक बॉडी, व्हॉल्व रबर सिटींग, सिटींग रिंग, पंप बकेट, गन मेटल फ्लॉवर, गन मेटल चेक व्हॉल्व गाईड, गन मेटल चेक व्हॉल्व सेट, सिलेंडर बॉडी लाईनर, गॅलोनीस हॅन्डल बार, स्टेनलेस स्टील हॅन्डल बार, एसकेएफ बेअरिंग ६२०४ झेड, रोलर चैन, बॉडी नटबोल्ट, जीआय वॉशर एम-१२.४ एम.एम., रॉड कपलिंग, कनेक्टींग रॉड, कनेक्टींग रॉड १२ एम.एम., हेड फॉर इंडिया मार्क, बोअरिंग ग्रिस व सबमर्सिबल पंप साठी लागणारे साहित्य ३ कोर ४.० स्के.एम.एम. कॉपर केबल, पॅनेल बोर्ड १ ते ६ एचपी, पीव्हीसी आरमाऊर्ड केबल २ कोर ४ स्के. एम.एम. ॲल्युमेनिअम कंडेनकटर, सबमर्सिबल पंप सेट २३०व्हो ५० एचझेड एसी सप्लाय, मोटर २ एचपी थ्री फेज १४०० एरपीएम ऑल टाईप्स, एमडीपीई पाईप आयएसओ ४४२७:१९९६, जीआय कप्लींग निप्पल फ्री क्लास इत्यादी किरकोळ साहित्य खरेदी करावे लागते. याबाबतचे दर दरसुची मध्ये उपलब्ध नसल्यामुळे दरपत्रक मागवून चालु बाजार भावाप्रमाणे सर्वकरांसहित दर मागविण्यात आलेले आहे.

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका प्रभाग समिती क्र. १ ते ५ च्या कार्यक्षेत्रात अस्तित्वात असलेल्या बोअरवेल निगा व दुरुस्तीकामी एक वर्षाच्या कालावधी करीता साहित्य पुरविणेबाबतच्या कामांस दि. २९/०३/२०२३ अन्वये प्रशासकीय व आर्थिक मान्यता प्राप्त झालेली आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|
| १ | **(सन २०२३-२०२४)**<br>**भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, प्रभाग समिती क्र. १ ते ५ च्या कार्यक्षेत्रात अस्तित्वात असलेल्या बोअरवेल निगा व दुरुस्तीकामी एक वर्षाच्या कालावधी करीता साहित्य पुरविणेबाबत.** | रु. ५६,२०,६१८/- |

शासन आदेश क्र. एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१(भाग-२)नवि-१४, दि.०६ जुन २०२२ रोजी नुसार मा. महासभा व मा. स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेसाठी प्रशासक नियुक्त करण्यांत आलेले आहेत. त्यामुळे भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेचा कार्यभार हे प्रशासक पहात आहेत. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५२ अ च्या (१अ) व (१ब) मधील तरतुदीनुसार निविदा विषयक संविदा करण्याचे अधिकार मा. प्रशासक यांना आहेत.

उपरोक्त नमुद पाणी पुरवठा विभागाकडील (सन २०२३-२०२४) भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका प्रभाग समिती क्र. १ ते ५ च्या कार्यक्षेत्रात अस्तित्वात असलेल्या बोअरवेल निगा व दुरुस्तीकामी एक वर्षाच्या कालावधी करीता साहित्य पुरविणेबाबतच्या प्रस्तावांची ई-निविदा मागविणे कामाची निविदामहा-ई-टेंडर पोर्टलवर प्रसिद्ध करणे कामी मंजुरी देणे बाबतचा प्रस्ताव.

**ठराव क्रमांक :** १६३ **दिनांक :** १० / ०५ / **२०२३**

(सन २०२३-२०२४) भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका प्रभाग समिती क्र. १ ते ५ च्या कार्यक्षेत्रात अस्तित्वात असलेल्या बोअरवेल निगा व दुरुस्तीकामी एक वर्षाच्या कालावधी करीता साहित्य पुरविणेबाबतचा प्रस्ताव कार्यकारी अभियंता व अति. आयुक्त यांनी शिफारस केल्यानुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन निर्णय क्र. एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) नवि-१४ दि.६ जुन २०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१अ) व (१ब) मधील तरतुदीनुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी विजयकुमार म्हसाळ, प्रशासक तथा आयुक्त, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, पाणी पुरवठा विभागाच्या ((सन २०२३-२०२४) भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका प्रभाग समिती क्र. १ ते ५ च्या कार्यक्षेत्रात अस्तित्वात असलेल्या बोअरवेल निगा व दुरुस्तीकामी एक वर्षाच्या कालावधी करीता साहित्य पुरविणेबाबतच्या कामीची ई निविदा प्रसिद्ध करणेस मंजुरी देत आहे.

**(विजयकुमार म्हसाळ)**
**प्रशासक तथा आयुक्त**
**भिवंडी नि.शहरमहानगरपालिका,भिवंडी.**

## भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका,भिवंडी
## बांधकाम विभाग

**प्रस्तावना:-**

**विषय :- प्रभाग समिती क्र.४ च्या कार्यक्षेत्रात जुना आग्रा रोड, जुना ठाणा रोड, मोमीन मजिद जवळ, इसराम मिठाई शॉप ते कदिम मजिद, साजीद हॉल ते इदगाह पाण्याची टाकी ते डंपींग्राऊंड, गौरीपाडा ते शकील बिल्डींग, नालापार रोड व विविध ठिकाणी डांबरीकरण पध्दतीने सुधारणा करणे.**

भिवंडी नि.श.महानगरपालिका कार्यक्षेत्रात प्रभाग समिती क्र.४ च्या कार्यक्षेत्रात जुना आग्रा रोड, जुना ठाणा रोड, मोमीन मजिद जवळ, इसराम मिठाई शॉप ते कदिम मजिद, साजीद हॉल ते इदगाह पाण्याची टाकी ते डंपींग्राऊंड, गौरीपाडा ते शकील बिल्डींग, नालापार रोड व विविध ठिकाणी डांबरीकरण पध्दतीने सुधारणा करणे. रु.४९,९८,५८४/- मात्रची ई निविदा सुचना क्र.२३७/२०२२-२३ नवराष्ट्र परशुराम समाचार या वर्तमानपत्रात जाहिरात देऊन तसेच महाराष्ट्र शासनाच्या (www.mahatenders.gov.in) देऊन या संकेतस्थळावर प्रसिध्द करुन ब-१ प्रकारची ई निविदा मागविणेत आली असता एकुण २ निविदा प्राप्त झाल्या असुन त्यांचा तैलनिक तक्ता खालील प्रमाणे.

| अ.क्र. | निविदाकार | दर |
|---|---|---|
| १ | **साई एस एस के इन्फ्रास्टक्चर** | **अंदाजपत्रकिय दरापेक्षा १.००० टक्के कमी दराने** |
| २ | झा पी ॲण्ड कंपनी | अंदाजपत्रकिय दराने |

**साई एस एस के इन्फ्रास्टक्चर, उल्हासनगर** यांनी दिलेला देकार न्युनतम असुन अंदाजपत्रकिय दरापेक्षा १.००० % कमी दराने म्हणजेच रक्कम रु.४९,४८,५९८/- येत आहे.

**साई एस एस के इन्फ्रास्टक्चर, उल्हासनगर** यांची अंदाजपत्रकिय दरापेक्षा १.००० % कमी दराने म्हणजेच रक्कम रु.४९,४८,५९८/- (अक्षरी एकोणपन्नास लाख अठ्ठेचाळीस हजार पाचशे अठ्यान्नव मात्र) च्या खर्चाची निविदा संविदा करणे कामी प्रस्तावास शहर अभियंता, मुख्य लेखापरिक्षक, मुख्य लेखा व वित्त् अधिकारी तसेच अति.आयुक्त यांनी केलेल्या शिफारशीप्रमाणे मा.आयुक्त महोदय यांनी त्यास मान्यता दिलेली आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ७३ (क) अन्वये संविदा करणे कामी व प्रशासकीय मान्यता या मिळणे कामी प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

(कृ.मागे पहा)

ठराव क्र. १६२ दिनांक :- ०९/५/२०२३

भिवंडी नि.श.महानगरपालिका कार्यक्षेत्रात प्रभाग समिती क्र.४ च्या कार्यक्षेत्रात जुना आग्रा रोड, जुना ठाणा रोड, मोमीन मजिद जवळ, इसराम मिठाई शॉप ते कदिम मजिद, साजीद हॉल ते इदगाह पाण्याची टाकी ते डंपींग्राऊंड, गौरीपाडा ते शकील बिल्डींग, नालापार रोड व विविध ठिकाणी डांबरीकरण पध्दतीने सुधारणा करणे. कामी सर्वात कमी दराचे निविदाकार **साई एस एस के इन्फ्रास्टक्चर, उल्हासनगर** यांची अंदाजपत्रकिय दरापेक्षा १.००० % कमी दराने म्हणजेच रु.४९,४८,५९८/- (अक्षरी एकोणपन्नास लाख अठ्ठेचाळीस हजार पाचशे अठ्यान्नव मात्र) ची निविदा मंजुरीस शहर अभियंता, मुख्य लेखापरिक्षक, मुख्य लेखा व वित्त् अधिकारी तसेच अति.आयुक्त यांनी केलेल्या शिफारशीप्रमाणे महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग,मंत्रालय यांचेकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१/(भाग-२)नवि-१४,दिनांक ०६ जुन २०२२ अनव्ये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ (१अ) मधिल तरतुदीच्या अनुषंगाने मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी विजयकुमार म्हसाळ, प्रशासक तथा आयुक्त, भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका, भिवंडी नि.श.महानगरपालिका कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती क्र.४ च्या कार्यक्षेत्रात जुना आग्रा रोड, जुना ठाणा रोड, मोमीन मजिद जवळ, इसराम मिठाई शॉप ते कदिम मजिद, साजीद हॉल ते इदगाह पाण्याची टाकी ते डंपींग्राऊंड, गौरीपाडा ते शकील बिल्डींग, नालापार रोड व विविध ठिकाणी डांबरीकरण पध्दतीने सुधारणा करणे. कामी सर्वात कमी दराचे निविदाकार **साई एस एस के इन्फ्रास्टक्चर, उल्हासनगर** यांचे समवेत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ७३ (क) अन्वये संविदा करण्यास मंजुरी देत आहे.

**(विजयकुमार म्हसाळ)**
प्रशासक तथा आयुक्त
भिवंडी नि.श.महानगरपालिका

## भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका,भिवंडी
## बांधकाम विभाग

**प्रस्तावना:-**

**विषय** :- प्रभाग समिती क्र.२ च्या कार्यक्षेत्रात भादवड पोलीस लाईन,टेमघर अंतर्गत रस्ते,शफि कंपा.,नवीवस्ती व शिवसेना ऑफिस ते खान कंपा. व विविध ठिकाणी डांबरीकरण पध्दतीने सुधारणा करणे.

प्रभाग समिती क्र.२ च्या कार्यक्षेत्रात भादवड पोलीस लाईन,टेमघर अंतर्गत रस्ते,शफि कंपा.,नवीवस्ती व शिवसेना ऑफिस ते खान कंपा. व विविध ठिकाणी डांबरीकरण पध्दतीने सुधारणा करणे कामी अंदाजपत्रकीय रक्कम रु. ४९,९२,२४७/-मात्रच्या प्रस्तावास मा.आयुक्त सो यांची दिनांक /०२/२०२३ रोजी मंजुरी प्राप्त झाली असुन उक्त कामास मा.प्रशासकीय ठराव क्रं.१२२ दिनांक १६/०३/२०२३ अन्वये प्रशासकीय व आर्थिक मंजुरी प्राप्त झाली आहे. सदर कामाची रक्कम रु. ४९,९२,२४७/- ई-निविदा सुचना क्र.२३४/२०२२-२३ (८८५३०१) दै. या वर्तमानपत्रात जाहीरात देवुन तसेच महाराष्ट्र शासनाच्या (www.mahatenders.gov.in) संकेतस्थळावर दि.०५/०४/२०२३ रोजी प्रसिध्द करुन ब-१ प्रकारची ई निविदा मागविणेत आली असता सदर कामासाठी एकुण २ निविदा खालीलप्रमाणे प्राप्त झाल्या आहेत.

| अनु क्रं. | निविदाकारांची नावे | निविदेतील दर |
|---|---|---|
| १ | मे.चंडीका कंन्स्ट्रक्शन,भिवंडी | अंदाजपत्रकीय दरापेक्षा १.०११ % कमी दराने |
| २ | मे.सुजित बाळासाहेब खरात, भिवंडी | अंदाजपत्रकिय दरापेक्षा ०.५० % कमी दराने |

वरील पैकी मे.चंडीका कंन्स्ट्रक्शन,भिवंडी यांची अंदाजपत्रकिय दरापेक्षा १.०११ ०% कमी दराची म्हणजेच रक्कम रु.४९,४१,७७५/- (अक्षरी एकोणपन्नास लाख एकेचाळीस हजार सातशे पंचाहत्तर मात्र) च्या खर्चाची निविदा संविदा करणे कामी प्रस्तावास शहर अभियंता, मुख्य लेखापरिक्षक, मुख्य लेखा व वित्त अधिकारी तसेच अति.आयुक्त यांनी केलेल्या शिफारशीप्रमाणे मा.आयुक्त महोदय यांनी मान्यता दिलेली आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ७३ (क) अन्वये संविदा करणे कामी व प्रशासकिय व आर्थिक मान्यता मिळणे कामी प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

ठराव क्र.:- १६१ दिनांक :-०८/०५/२०२३

मे.चंडीका कंन्स्ट्रक्शन,भिवंडी यांची अंदाजपत्रकिय दरापेक्षा १.०११ % कमी दराने म्हणजेच रक्कम रु.४९,४१,७७५/- (अक्षरी एकोणपन्नास लाख एकेचाळीस हजार सातशे पंचाहत्तर मात्र) ची निविदा मंजुरीस शहर अभियंता, मुख्य लेखापरिक्षक, मुख्य लेखा व वित्त् अधिकारी तसेच अति.आयुक्त यांनी केलेल्या शिफारशीप्रमाणे महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग,मंत्रालय यांचेकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१/(भाग-२)नवि-१४,दिनांक ०६ जुन २०२२ अनव्ये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ (१अ) मधिल तरतुदीच्या अनुषंगाने मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी विजयकुमार म्हसाळ,प्रशासक तथा आयुक्त,भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका प्रभाग समिती क्र.२ च्या कार्यक्षेत्रात भादवड पोलीस लाईन,टेमघर अंतर्गत रस्ते,शफि कंपा.,नवीवस्ती व शिवसेना ऑफिस ते खान कंपा. व विविध ठिकाणी डांबरीकरण पध्दतीने सुधारणा करणे. कामी सर्वात कमी दराचे निविदाकार मे.चंडीका कंन्स्ट्रक्शन,भिवंडी यांचे समवेत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ७३ (क) अन्वये संविदा करण्यास मंजुरी देत आहे.

**(विजयकुमार म्हसाळ)**
प्रशासक तथा आयुक्त
भिवंडी नि.श.महानगरपालिका

# भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी
## बांधकाम विभाग,

विषय :- भिवंडी मनपाच्या नव्याने बांधण्यात आलेल्या बी.जी.पी. दवाखाना इमारतीचे आतील उर्वरित कामे करणे बाबत कामी प्राप्त निविदा मंजुरकरुन संविदा करणेस मान्यता मिळणेबाबत.

भिवंडी मनपाच्या नव्याने बांधण्यात आलेल्या बी.जी.पी. दवाखाना इमारतीचे आतील उर्वरित कामे करणे बाबत कामी प्राप्त निविदा मंजुरकरुन संविदा करणेस मान्यता मिळणेबाबत कामी प्रस्ताव तयारकरणेत आले आहे. विषयांकित दवाखाना हा शहरातील मध्यवर्ती ठिकाणी असून त्याचा वापर शहरातील बहुतांश नागरिकांना होणार आहे. आज मितीस इमारतीचे बांधकाम पूर्ण झाले असून उर्वरित आतील कामे करणे बाकी आहेत . त्या अनुषंगाने सदर कामाकरीता अंदाजे रक्कम रुपये ७१,७८,६२४/- इतक्या रकमचे अंदाजपत्रकतयार केले आहे.

भिवंडी मनपाच्या नव्याने बांधण्यात आलेल्या बी.जी.पी. दवाखाना इमारतीचे आतील उर्वरित कामे करणे बाबत कामी प्राप्त निविदा मंजुरकरुन संविदा करणेस मान्यता मिळणेबाबत करणेचे काम **महानगरपालिका इमारती बांधणे** २०२३-२४ अंर्तगत प्रस्तावित असून सदर कामास **मा. आयुक्त सो** यांनी दिनांक २६/१२/२०२२ अन्वये प्रशासकिय व वित्तीय मान्यता देण्यात आलेली आहे.

उपरोक्त प्रस्तावित कामा साठी ई-निविदा सुचना क्र.१९९(८७०५७३) दि.०८/२/२०२३ ते ०४/३/२०२३ या कालावधीत दैनिक महाराष्ट्र टाईम्स, दै. महानगर टाईम्स, इकॉनॉमिक टाइम्स या वृत्तपत्रामध्ये व मनपा संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली होती. सदर निविदेचे दुसरे पाकिट दिनांक २०/०३/२०२३ रोजी उघडण्यात आले असुन, त्यानुसार खालील प्रमाणे देकार ठेकेदारां कडुन प्राप्त झालेले आहेत. सदर कामी दोन निविदा प्राप्त झाली असून त्यामधील तुलनात्मक दर तपशिल खालील प्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| **१.हिंन्दुस्थान इंटरप्रायझेस** | **अंदाजपत्रकीय दराने** |
| २.बुबेरे ॲण्ड असोसिएटस | अंदाजपत्रकीय दरापेक्षा १.००० टक्के जादा दराने |

उपरोक्त निविदा सर्वात कमी दराचे निविदाकार **मे.हिंन्दुस्थान इंटरप्रायझेस** यांची निविदा अंदाजपत्रकीय दराने म्हणजेच रक्कम रु.**७१,७८,६२१/-** मात्रची असून सदर निविदा दरास निविदा समितीने मान्यता दिलेली आहे.

तरी वरीलकामी **मे.हिंन्दुस्थान इंटरप्रायझेस** यांची रक्कम रु.**७१,७८,६२१**/- दराची निविदा सद्या स्थायी समिती गठीत करण्यात आलेली नसल्याने व त्याबाबतचे अधिकार हे महानगरपालिकीकडे तबदिल असल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ अन्वयेकलम ३५-अ नुसार दरकरार निश्चित करणेकरिता प्रस्ताव मंजुरीसाठी सादर करण्यात आला आहे.

**प्रशासकिय ठराव क्र.** १६० **दिनांक** 08/04/2023

भिवंडी मनपाच्या नव्याने बांधण्यात आलेल्या बी.जी.पी. दवाखाना इमारतीचे आतील उर्वरित कामे करणे बाबत कामी न्युन्यत्तम दराचे निविदाकार **मे.हिंन्दुस्थान इंटरप्रायझेस यांची अंदाजपत्रकिय** दराने **म्हणजेच एकुण रक्कम रुपये ७१,७८,६२१/-** (एकातर लक्ष अध्यातर हजार सहाशे एकवीस **रुपये मात्र) ची** ई-निविदा मंजूरीस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ क नुसार संविदा करण्यास महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचेकडिल शासन आदेश अन्वये मधील तरतुदीच्या अनुषंगाने मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार दरकरार करण्यास मंजूरी देत आहे.

**( विजयकुमार म्हसाळ)**
**प्रशासक तथा आयुक्त**
**भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका**